सं.फौ.ख.क्र. १२१८/२०२२
सरकार वि. किशोर बावणे
निशाणी क्र. ०१ पुढे निरंतर

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे प्रकरण एकविस अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेला संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १२१८/२०२२ यांचा अभिलेख**

**श्री. व्हि.एम.बन्सोड, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, सेलु यांचे न्यायालय.**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – | ०७/१०/२०२२ |
| २. अहवालचा किंवा फिर्यादचा दिनांक | – | ०७/१०/२०२२ |
| ३. अभियोजन पक्ष | – | महाराष्ट्र सरकारतर्फे<br>पोलीस स्टेशन, सिंदी रेल्वे<br>ता. सेलू, जि. वर्धा |
| ४. आरोपीचे नाव व पत्ता | – | किशोर उर्फ गोलु विष्णुजी बावणे<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी<br>रा. पळसगांव रोड, सिंदी रेल्वे<br>ता. सेलू, जि. वर्धा |

५. अपराधाचा तपशिल

१. दि. ०७/१०/२०२२ रोजी २०.३० ते २१.०० वाजे सुमारास, आंबेडकर वार्ड, सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा येथे तुम्ही सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करून येणा–या जाणा–या लोकांसोबत असभ्य वर्तन केले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पोलिस कायदयाचे कलम ११० अंतर्गत तरतुदीचे उल्लंघन करून त्याच अधिनियमातील कलम ११७ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे व त्याची मी दखल घेत आहे.

सेलु
दि. ०५.०९.२०२३

(व्हि.एम.बन्सोड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलु

<u>**अपराधीपणाच्या कबुलीबाबत आरोपींचे निवेदन**</u>

प्र.क्र.१ – तुम्हाला दोषारोपपत्राची नक्कल मिळाली काय?
उत्तर – होय.
प्र.क्र.२– तुम्हाला अपराधाचा तपशिल समजला काय?
उत्तर – होय.

प्र.क्र.३- तुम्हाला अपराधी असल्याचे कबूल आहे काय? तुम्हाला काही बचाव द्यायचा आहे काय?
उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

-----------------

आरोपीची सही समक्ष

सेलु (व्हि.एम.बन्सोड)
दि. ०५.०९.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलु

## <u>न्यायनिर्णय</u>

आरोपीने इच्छापूर्वक गुन्हा कबूल असल्याचे कथन केले आहे. त्याबाबत त्याने पुरसीस नि.क्र. ०२ दाखल केलेली आहे. म्हणून आरोपीची अपराधीपणाची कबूली स्विकारण्यात येत आहे.

आरोपीला शिक्षेच्या मुद्दयावर एकण्यात आले. आरोपीने त्याच्यावर दया दाखवून कमीत कमी शिक्षा होण्याबाबत कथन केले. गुन्हयाचे तथ्यकथन व स्वरुप विचारात घेता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपीला महाराष्ट् पोलिस कायदयाचे कलम ११० चे उल्लंघन करीता सदर कायद्याचे शिक्षापात्र कलम ११७ अन्वये अपराधाच्या आरोपासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५२ नुसार सिध्द दोषी ठरवून त्याला रक्कम रुपये ३००/-(अक्षरी रुपये तीनशे फक्त) दंड भरण्याची शिक्षा ठोठावण्यात येते.

२. आरोीपने दंडाची रक्कम न भरल्यास एक दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुणावन्यात येते.

VINOD MULCHAND BANSOD
Digitally signed by VINOD MULCHAND BANSOD
Date: 2023.09.05 17:38:03 +0530

सेलु (व्हि.एम.बन्सोड)
दि. ०५.०९.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलू.